## महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद

### जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र
### सोलापूर

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,
सोलापूर
८/९, रविवार पेठ, कन्ना चौक, सोलापूर.

# प्रस्तावना

राज्य शासनाच्या स्तरावर सुरु केलेल्या प्रशासकीय सुधारणांच्या धोरणांत्मक कार्यक्रमांमध्ये जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर या कार्यालयाकडून उमेदवारांना पर्यायाने नागरिकांना दिल्या जाणा-या सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर या कार्यालयाची नागरिकांची सनद प्रसिध्द करताना मला अतिशय आनंद होत आहे. देशातील नागरिक हा केंद्रबिंदू मानून शासनाकडून पुरवण्यात येणा-या विविध प्रकारच्या सेवा व योजनाची अंमलबजावणी करताना पारदर्शकता, नियमाप्रमाणे कामकाज, कामाची कालमर्यादा, कामाचा दर्जा कार्यक्षमता राखणे व शासकीय सेवा पुरविण्यामध्ये स्तर निश्चित करुन जबाबदारी निश्चित करणे इ.बाबी नागरिकांची सनद या माध्यमातून साध्य करण्याची संकल्पना आहे

नागरिकांची सनदचे लोकाभिमुखता,प्रतिसाद शिलता,पारदर्शकता व गतिमानता हे महत्वाचे पैलू लक्षात घेऊन त्या अनुषंगाने रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे शासन स्तरावर संगणकीकरण करुन http:/ www.mahaswayam.gov.in ही वेबसाईट दिनांक ०३ जानेवारी २०१३ पासून सुरु झाली आहे. या वेबसाईटवरुन नागरिकांना नाव नोंदणीसह,नूतनीकरण,अपडेशन,ज्येष्ठता पहाणे,नोकरीविषयक जाहिराती पहाणे, सेवायोजन सेवाविषय उमेदवारांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे इ.सेवा घरबसल्या उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या आहेत. तसेच उदयोजकांना त्यांच्या आस्थापनांची नोंदणी करणे, योग्य व पात्र अमेदवारांचा शोध घेणे,रिक्तपदे अधिसुचित करणे,इ.सुविधा www.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या आहे.

शासनाच्या सुधारित धोरणानुसार उमेदवारांना देण्यात येणा-या नाव नोंदणी,नुतनीकरण या सेवांबरोबरच शैक्षणिक पात्रता वाढ,पत्ता बदल,फोन,ईमेल अपडेशन सेवा त्याचप्रमाणे उदयोजकांना उद्योजक नोंदणी,ई आर-१ विववरणपत्रे सादर करणे.

या पुस्तिकेतील पहिल्या भागामध्ये या कार्यालयाचे कामकाज संबंधित सर्वसाधारण माहिती देण्यात आली आहे, तर दुस-या भागात प्रत्यक्ष नागरिकांची सनद देण्यात आली आहे.जिल्हा कार्यालयांमार्फत पुरविण्यात येणा-या सेवा,त्यासाठी आवश्यक कागदपत्रे,लागणारा कालावधी,सेवा विहित कालावधीत पुरविण्यांत आल्या नाहीत तर कोणाकडे तक्रार/संपर्क साधावा त्या अधिका-यांचे पदनाम व दुरध्वनी क्रमांक यामध्ये देण्यांत आले आहेत.मला खात्री आहे की,यात नमूद केल्यानुसार विहित कालावधीत आवश्यक सेवा नागरिंकाना निश्चित कालमर्यादेत उपलब्ध होतील.

दिनांक – ०२/०५/२०१९

दि.गं.कुंभार<br>
सहायक संचालक,<br>
जिल्हा कौशल्य विकास,<br>
रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र<br>
सोलापूर

# अनुक्रमणिका


| अ.क्र | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **भाग – १ सर्वसाधारण माहिती** | |
| १ | कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता (सेवायोजन)विभागाचा पूर्व इतिहास | १ |
| २ | स्वयंरोजगाराकरिता अर्थसहाय्यक | २ |
| | अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ | |
| ३ | बेरोजगारांसाठी सेवा सोसायटया स्थापनेचा उपक्रम | ३-४ |
| ४ | कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता विभागामार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम | ४-८ |
| | अ)सेवायोजन क्षेत्र माहिती गोळा करणे | |
| | ब) बेरोजगारांची नाव नोंदणी | |
| | क) नोकरीसाठी सहाय्यक करणे | |
| | ड) व्यवसाय मार्गदर्शन करणे | |
| | ई) शासनाच्या धोरणात्मक योजनांची अंमलबजावणी करणे | |
| | फ) रोजगार व स्वयंरोजगार मेळावे | |
| | ह) कौशल्य विकास कार्यक्रम | |
| ५ | कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता यंत्रणेच्या कार्यप्रणालीचे संगणीकरण | ९-१० |
| ६ | सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे सक्तीने अधिसूचित करणे)अधिनियम ,१९५९ | १०-१२ |
| | **भाग – २ नागरिकांची सनद** | |
| ७ | कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता कार्यालयाकडून पुरविल्या जाणा-या सेवा,त्यासाठी आवश्यक कागदपत्रे,कालावधी व सेवा पुरविणारा अधिकारी,इ | १३-१५ |
| ८ | विभागाचा संरचनात्मक तक्ता. | १६ |
| ९ | विभागातील अधिका-यांचे दूरध्वनी क्रमांक | १७-२० |

भाग १ : <u>कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता विभागाची सर्वसाधारण माहिती</u>

## १ कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता विभागाचा पूर्व इतिहासः

रोजगार व स्वयंरोजगार सेवायोजन ही यंत्रणा दुस-या महायुध्दात जखमी झालेल्या सैनिकांचे पुर्नवसन करण्याच्या उदे्शांने केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली जुलै, १९४५ मध्ये स्थापन करण्यात आली आहे. ही सेवा १९४६ पर्यंत सैनिकांच्या पुनर्वसनासंबंधाने कार्यरत होती. या सेवेचा विस्तार १९४८ पासून बेरोजगार उमेदवारांसाठी देशभरात सेवायोजन कार्यालयाच्या माध्यमातून सुरु करण्यात आला. तथापि या संदर्भातील आवश्यकता विचारात घेऊन केंद्र शासनाने देशातील लोकसंख्येच्या प्रमाणात सेवायोजन सेवेचा प्रभावी लाभ कशाप्रकारे जनतेला देता येईल याचा विचार करण्यासाठी १९५२ साली श्री.बी.शिवराव यांच्या अध्यतेखाली एक समिती स्थापना केली. या समितीने सेवायोजन यंत्रणेची संरचना व कार्य याचा अभ्यास करुन त्यात काही सुधारणा करण्याची आवश्यकता असल्यास तशा शिफारशी करावयाच्या होत्या. त्यानुसार समितीने १९५४ साली केलेल्या शिफारशी विचारात घेऊन केंद्र शासनाने सेवायोजन संघटनेच्या पुनर्रचनेत व्यवसायिक संशोधन,व्यवसाय मार्गदर्शन आणि सेवायोजन क्षेत्राची माहिती इ.बाबींचा समावेश केला. त्याचप्रमाणे संघटनेच्या दैनंदिन प्रशासनाच्या दृष्टीने सेवायोजन संघटनेचे कामकाज राज्य शासनाकडे १ नोव्हेंबर १९५६ साली हस्तांतरित केले.

रोजगार व स्वयंरोजगार सेवायोजन संघटनेचे कामकाज प्रभावीपणे करण्यासाठी लोकसभेव्दारे सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे सक्तीने अधिसुचित करणे) अधिनियम, १९५९ पारित करण्यात येऊन ती दिनांक १ मे,१९६० च्या नियमावलीन्वये लागू करण्यात आला.या कायद्यातील तरतुदीनुसार २५ व त्यापेक्षा जास्त कामगार / कर्मचारी असणा-या खाजगी आस्थापना आणि सार्वजनिक क्षेत्रांना त्यांच्याकडील रिक्त पदे अधिसुचित करण्याचे व त्यांच्याकडे असणा-या मनुष्यबळाची माहिती देण्याचे बंधन आहे.सेवायोजन संबंधाचे धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार राबविण्याची जबाबदारी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, महाराष्ट्र राज्य,नवी मुंबई यांच्याकडे असते. या संचालनालयाच्या अधिपत्याखाली राज्यातील सर्व कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्राचा कारभार चालविला जातो. शासनाचा महत्वाकांक्षी रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीचा कार्यक्रम परिणामकारकरित्या राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक १ मे,१९९७ पासुन रोजगार व स्वयंरोजगार या स्वतंत्र विभागाची स्थापना केली. सद्यःस्थितीत महाराष्ट्र राज्यात एकूण ५४ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र (कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रे, विद्यापीठ ,आदिवासी,तांत्रिक,अपंगार्थ, कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्रासह) आहेत. महाराष्ट्र ६ महसूली विभागानुसार प्रत्येक महसूल विभागात १ प्रमाणे ६ विभागीय कार्यालये आहेत, अशी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयासह एकुण ६१ कार्यालये आहेत.

कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन विभागाच्या मंत्र्यांच्या अधिपत्याखाली प्रामुख्याने राज्यमंत्री, प्रधान सचिव,उपसचिव, अवर सचिव आणि कार्यासन (कक्ष अधिकारी) हे मंत्रालयीन पातळीवर काम पहातात. तर आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता संचालनालय,महाराष्ट्र राज्य कोकण भवन,नवी मुंबई यांच्या अधिपत्याखाली मुंबई,पुणे,नाशिक,नागपुर,औरंगाबाद व अमरावती अशा ६ विभागांमध्ये विभागीय उपसंचालक कार्यरत आहेत. विभागीय उपसंचालकांच्या अधिपत्याखाली ३९ कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्रे, ६ विद्यापीठ, कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन माहिती व मार्गदर्शन केंद्रे तसेच ८ आदिवासी उमेदवारांकरिता कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्रे तसेच १९ जानेवारी १९५९ रोजी मुंबई येथे् अपंगासाठी विशेष मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले असून दि.२९/७/२००४ पासून राज्यातील सर्व कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता केंद्रामध्ये अपंगार्थ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत.

**२) स्वयंरोजगाराकरिता अर्थसहाय्य**

**महामंडळाचे कामकाज जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता केंद्रामार्फत :**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे काम शासन परिपत्रक क्र.इएसई-२००१/प्र.क्र.११६/रोस्वरो-१,दिनांक २२ जून २००१ अन्वये महामंडळाची स्वतःची कार्यालये सुरु होई पर्यंत कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता संचालनालयाच्या अखत्यारीतील जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता केंद्रामार्फत करण्यात येत आहे.

समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील लोकांचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने दिनांक २७ नोव्हेंबर १९९८ रोजी कंपनी कायदा,१९५६ अंतर्गत शासनाने अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास मागास महामंडळाची स्थापना केली.

राज्यातील आर्थिक दृष्टया मागास घटकातील उद्योजक बनू इच्छिणाऱ्या व तशी क्षमता असलेल्या तरुण वर्गाला आर्थिक सहाय्य पुरविणा-या दृष्टी **छत्रपती राजाराम महाराज उद्योजकता व कौशल्य विकास अभियाना अंतर्गत अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळातर्फे** खालील तीन योजना राबविल्या जात आहेत.

१) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (IR-1),

२) गट प्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना (IR-2),

३) गट प्रकल्प कर्ज योजना (FPO) (GL-1) या तीन योजना राबविण्यात येत आहेत.

१. **वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना** – नॉन –क्रिमिलेअर करिता असलेल्या कौटूंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार) असलेल्या व बँकेने रू. १०.०० लाखापर्यंतच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या उमेदवाराने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम (१२टक्केच्या मर्यादेत)त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. सदर योजना संपूर्ण पणे संगणीकृत असून प्रक्रीया सार्वजनीक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस)अथवा तत्सम संगणक प्रणालीदवारे राबविण्यात येईल. तसेच या योजनेकरिता एकूण प्रस्तावित निधीच्या किमान ४ टक्के निधी दिव्यांगांसाठी (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या दिव्यांगांच्या व्याख्येनुसार)राखीव ठेवण्यात येत आहे.

२. **गट कर्ज व्याज परतावा योजना** – नॉन –क्रिमीलेअर करिता असलेल्या कैाटूंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार)असलेल्या उमेदवारांच्या गटासंदर्भात, बँक कर्ज मर्यादा प्रती गटास कमीत कमी रू.१०.०० लाख ते जास्तीत जास्त रु.५०.०० लाखापर्यतच्या देण्यात आलेल्या उद्योग उभारणी कर्जावर ५ वर्षा पर्यंत अथवा कर्ज कालावधी या पैकी जे कमी असेल ते, जास्तीत जास्त १२ टक्के व्याज दराने आणि रू.१५ लाखांच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. सदर योजना संपूर्ण पणे संगणकीकृत असून प्रक्रीया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) या अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येईल. तसेच या योजनेकरिता एकुण प्रस्तावित निधीच्या किमान ४ टक्के निधी दिव्यांगांसाठी (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या दिव्यांगांच्या व्याख्येनुसार) राखीव ठेवण्यात येत आहे.

३. **गट प्रकल्प कर्ज योजना** - महामंडळामार्फत सदर योजनेंतर्गत, नॉन – क्रिमिलेअर करिता असलेल्या कौटूंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार) असलेल्या उमेदवारांच्या पात्र शेतकरी उत्पादक (F.P.O.)गटांना (Farmers Producers Organisation-FPO, कंपनी कायदा, २०१३ अन्वये स्थापन झालेले) रू.१०.०० लाखा पर्यंत बिनव्याजी दराने कर्ज रक्कम उद्योगाकरीता देण्यात येईल. सदर योजना संपूर्णपणे संगणकीकृत असून प्रक्रीया सार्वजनीक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस)

या अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येईल. तसेच या योजनेकरिता एकूण प्रस्तावित निधीच्या किमान ४ टक्के निधी दिव्यांगांसाठी (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या दिव्यांगांच्या व्याख्येनुसार) राखीव ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र | योजनेचे नाव | कर्ज मर्यादा | व्याज परतावा दर |
|---|---|---|---|
| १. | वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना | १० लाख | जास्तीत जास्त १२% पर्यंत |
| २. | गट कर्ज व्याज परतावा योजना | २ भागीदार-२५ लाख पर्यंत<br>३ भागीदार-३५ लाख पर्यंत<br>४ भागीदार-४५ लाख पर्यंत<br>५ भागीदार-५० लाख पर्यंत | जास्तीत जास्त १२% पर्यंत |
| ३ | गट प्रकल्प कर्ज योजना | १०लाख (महामंडळाकडून) | बिनव्याजी |

**३) महाराष्ट्र शासनाचा बेरोजगारांसाठी सेवा सहकारी संस्था स्थापनेचा उपक्रमः-**

महाराष्ट्र राज्यामध्ये नोंदणी पटाप्रमाणे बेरोजगारांची संख्या डिसेंबर २०१० अखेर २६.८२ लाखावर गेलेली आहे.त्या तुलनेत बेरोजगारांना अगदी नगण्य प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. अल्पशा प्रमाणात उपलब्ध होणा-या रोजगाराच्या संधीमध्ये सर्व बेरोजगारांना नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देणे अशक्यप्राय आहे.त्यावर अनेक उपायापैकी एक उपाय म्हणून तरुण बेरोजगारांना स्वयंरोजगाराच्या नवनवीन संधी उपलब्ध करुन देणे हा होय. बेरोजगारांची तीव्रता कमी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ऑक्टोबर २००० मध्ये एक सर्वसमावेशक बेरोजगारांचे नवीन धोरण जाहीर केले. त्यामध्ये बेरोजगार तरुणांनी एकत्र येऊन सेवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून स्वयंरोजगार सुरु करावा हा हेतू आहे. त्याप्रमाणे विभागात बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था स्थापन करण्याचे कामकाजास सन २००१ पासून सुरुवात झाली.किमान ११ बेरोजगार किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवार एकत्र येऊन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार सेवा सहकारी संस्था स्थापन करतात व त्यानंतर संबंधित संस्था कामे मिळविण्यासाठी प्रयत्न करतात.

बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थाना व लोकसेवा केंद्रांना विविध सवलती देऊन त्यांना आर्थिक दृष्टया बळकट करण्यासाठी शासनाने दिनांक १७ ऑगस्ट २००२ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन बेरोजगार उमेदवारांच्या सेवा सहकारी संस्थांना मोठा दिलासा दिलेला आहे.त्यानुसार शासनाच्या बहुतांश विभागांनी शासन निर्णय पारित करुन बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना कामे देण्याबाबत आपल्या विभागांमार्फत येणा-या कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थाना शासनाच्या विविध विभागाकडून कामे मिळत आहेत.

.शासन निर्णय दिनांक ११ फ्रेब्रुवारी २००४ रोजी प्रशासनाने घेतला आहे.शासन निर्णय क्र.इएसई-२००३/प्र.क्र.१९१/रोस्वरो-१ दि.१ फ्रेब्रुवारी २००६ अन्वये बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना व लोकसेवा केंद्राना रु.पाच लाखापर्यंतची कामे विनानिविदा देणेबाबतचे आदेश निगामित करण्यात आलेल आहेत.

४) **कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता संचालनालयातर्फ विभागात खालील महत्वाचे कार्यक्रम राबविण्यात येतातः**

अ) सेवायोजन क्षेत्र माहिती गोळा करणे
ब) बेरोजगारांची नाव नोंदणी
क) नोकरीसाठी सहाय्यक करणे
ड) व्यवसाय मार्गदर्शन करणे
ई) शासनाच्या धोरणात्मक योजनांची अंमलबजावणी करणे
फ) रोजगार व स्वयंरोजगार मेळावे
ह) प्रमोद महाजन कौशल्य विकास व उदयोजकता विकास अभियान

**अ) सेवायोजन क्षेत्र माहिती गोळा करणेः**

राज्यातील ३५ जिल्हा कौशल्य विकास रोजगार व मार्गदर्शन केंद्र मध्ये सेवायोजन क्षेत्र माहिती केंद्र आहेत. आणि कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता संचलनालयात एक राज्य सेवायोजन क्षेत्र माहिती केंद्र आहे.

राज्यातील कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्रातील सर्व सेवायोजन क्षेत्र माहिती पथके सेवायोजन क्षेत्रातील माहिती गोळा करतात. ही माहिती सरकारी क्षेत्रातील सर्व आस्थापना कडून व सर्वसाधारण पणे १० किंवा अधिक कर्मचारी सातत्याने कामावर असणा-या खाजगी क्षेत्रातील आस्थापनाकडून गोळा करण्यात येते. ही २५ किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी असणा-या खाजगी आस्थापनांकडील मनुष्यबळाची माहिती दर तिमाहीस गोळा करण्यात येते. ही माहिती सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे सक्तीने अधिसुचित करणे) अधिनियम १९५९ च्या कलम ५ (१) व ५ (२) अन्वये स्थानिक कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन क्रेंद्रांस पाठविणे बंधनकारक आहे.

**ब ) बेरोजगारांची नाव नोंदणी :**

कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता संचालनालयाचे वेबपोर्टल ttps://mahaswayam.gov.in द्वारे राज्यातील नोकरी इच्छुक उमेदवार ऑनलाईन नाव नोंदणी करु शकतात.

नाव नोंदणीकरिता वयाची १४ वर्षे पूर्ण होणे आवश्यक आहे.उमेदवार नोंदणी करेल त्याच वेळी नोंदणी केलेली रिसीट म्हणजेच रोजगार कार्ड प्राप्त होईल. या नोंदणीसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही.

**नूतनीकरण**

उमेदवाराने नावाची नोंदणी केल्यानंतर ती १ वर्षासाठी वैध राहते. त्यानंतर उमेदवारांना या नोंदणीचे नूतनीकरण ऑनलाईन करणे गरजेचे आहे.

**क) नोकरीसाठी सहाय्य करणे**

दि.२२ ऑगस्ट १९९६ च्या मा.सर्वोच्च न्यायालय यांचे क्रमांक सिव्हील अपील नं ११६४६-११७२४/१९९६ या प्रकरणी निकालाप्रमाणे कोणत्याही शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी आस्थापनेत रिक्त पदे भरताना नवीन पध्दत ठरविण्यात आलेली आहे. या पध्दतीप्रमाणे सर्व आस्थापनांवर दोन मार्गाने उमेदवारांची यादी प्राप्त करणे बंधनकारक करण्यात आले आहेः-

१) कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र यांचेकडील वेबपोर्टलवरुन पात्र उमेदवारांची यादी प्राप्त करुन घेणे.

२) जाहिरातीद्वारे व अन्य माध्यमातून प्रसिध्दी देऊन पात्र उमेदवारांचे अर्ज प्राप्त करुन घेणे.

अशा त-हेने दोन्हीही प्रकारच्या उमेदवारांना पद भरतीसाठी विचार करणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाच्या पत्राप्रमाणे आता सर्व राज्य शासनावर सदर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाप्रमाणेच पद भरती करणे बंधनकारक झाले आहे. म्हणजे कोणत्याही शासकीय/निमशासकीय विभागात पद भरती करताना कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता केंद्राकडून उमेदवारांची यादी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे व त्याशिवाय जाहिरातीद्वारे,दूरदर्शन,रेडिओ,नोटीसबोर्ड व इतर माध्यमातून प्रसिध्दी देऊन उमेदवारांचे अर्ज प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.जेणेकरुन कोणत्याही पात्र उमेदवारांवर अन्याय होऊ नये व दोन्हीही माध्यमाद्वारे उपलब्ध होणा-या उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतील.या निर्णयाप्रमाणे जर एखादा उमेदवार कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता केंद्रात नोंदणीकृत नसेल किंवा काही कारणामुळे त्याचे नाव कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता केंद्रामार्फत वेबपोर्टलवरुन ऑनलाईन आलेल्या यादीत समाविष्ट नसेल,तरी असा पात्र उमेदवार जाहिरातीच्या आधारे संबंधित आस्थापनेकडे सरळ अर्ज करु शकतो

**ड) (एक) व्यवसाय मार्गदर्शन कक्ष (करीअर मार्गदर्शन):**

कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता केंद्रामध्ये व्यवसाय मार्गदर्शनाकरिता आवश्यक ते साहित्य, पुस्तके, माहितीपत्रके इत्यादी उमेदवारांना उपलब्ध असतात व त्यांना वेगवेगळया स्वयंरोजगाराबदद्ल मार्गदर्शन दिले जाते. तसेच स्वयंरोजगारासाठी त्यांना प्रवृत्त केले

जाते. विविध वित्तीय संस्था उदा. बॅका, जिल्हा उद्योग केंद्रे इत्यादींशी संपर्क साधून स्वयंरोजगारासाठी इच्छूक उमेदवारांना मदत केली जाते.

व्यवसाय मार्गदर्शन कक्षामध्ये मुख्यत्वेकरुन रोजगार व स्वयंरोजगार प्रशिक्षणाच्या संधी तसेच व्यवसाय,शैक्षणिक करिअर इत्यादींबाबत मार्गदर्शन केले जाते.व्यवसाय मार्गदर्शन कक्षाचे काम अधिक प्रभावी बनविण्यासाठी या कक्षामध्येच लायब्ररी सदृश्य करिअर कॉर्नर सुरु करण्यात आला आहे.

आत्ता पर्यंत राज्यातील ४९ कार्यालयामध्ये करिअर ग्रंथालयसदृश अभ्यासिका सुरु झाले आहे.यामध्ये स्पर्धा परिक्षेसाठी उपयुक्त पुस्तके/मासिके व वर्तमानपत्र उपलब्ध करुन मोफत वाचनाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

**<u>ई) शासनाच्या धोरणात्मक योजनांची अंमलबजावणी करणे.</u>**

**(एक) रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमः**

रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम योजना सन १९७३-७४ पासून राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत सेवायोजन कार्यालयांत नांव नोंदविलेल्या सुशिक्षित अमेदवारांना त्यांचे कौशल्य व क्षमता वाढविण्यासाठी खाजगी आस्थापनांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाते. सदर योजनेच्या प्रयोजनासाठी सुशिक्षित बेरोजगारांची व्याख्या अशी आहे.की,ज्या व्यक्तीचे वय १८ वर्ष पूर्ण असून किमान शिक्षण शालांन्त परीक्षा उत्तीर्ण अथवा औद्योगिक प्रशिक्षण उत्तीर्ण अशी आहे.प्रशिक्षणानंतर प्रशिक्षणार्थीचा कौशल्य विकास होऊन रोजगार क्षमतेत वाढ होऊन रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्ध होण्याच्या संधीत वाढ होते.सदर योजनेचा कालावधी सहा महिन्याचा असून यासाठी उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे दरमहा रुपये ३००/- ते रुपये १,०००/- विद्यावेतन दिले जाते.

## विद्यावेतनाचे दर खालीलप्रमाणेः-

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | दरमहा विद्यावेतन रूपये |
|---|---|---|
| १ | एस एस सी उत्तीर्ण | ३००/- |
| २ | तांत्रिक प्रमाणत्रधारक (आय टी आय) | ३००/- |
| ३ | पदवीधर | ५००/- |
| ४ | पदवीकाधारक | ७००/- |
| ५ | नर्सिंग | ७००/- |
| ६ | पदव्युत्तर | ८००/- |
| ७ | इंजिनिअर पदवीधर | १०००/- |

**(दोन) कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता केंद्रात अपंग उमेदवारांसाठी विशेष कक्ष.**

१९ जानेवारी १९५९ रोजी मुंबई येथे अपंगासाठी विशेष मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले असून दि.२९/०७/२००४ पासून राज्यातील सर्व कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्रामध्ये अपंगार्थ रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन कक्ष स्थापना करण्यात आले आहे. अपंगाना स्वाभिमानाने जगण्यासाठी शासकीय नोक-यामध्ये अपंग व्यक्ती (समान संधी ,संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण)अधिनियम,१९९५ नुसार शासन सेवेतील पदांवर शारीरिकदृष्टया अपंगासाठी आरक्षण ठेवण्याची कार्यपध्दती सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.एसआरव्ही १०९७/प्र क्र१२/९७/१६-अ, दि.२ मे,१९९८ अन्वये ३% आरक्षण ठेवण्याची कार्यवाही कार्यान्वीत करण्यात आले आहे.

**(फ) रोजगार व स्वयंरोजगार मेळावे:**

**रोजगार मेळावे.**

या योजनेद्वारे रोजगार मेळाव्यातून उमेदवारांना अनेक उद्योजकाकडे एकाच ठिकाणी मुलाखतीची संधी प्राप्त होणे व उद्योजकांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची उपलब्धता करुन देण्यात येते, असे रोजगार मेळावे प्रत्येक जिल्हयात एका वर्षात किमान चार व विभागीय स्तरावर किमान एक असे आयोजित करण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. त्याकरिता जिल्हयाची लोकसंख्या विचारात घेऊन विभागीय स्तरावरील मेळाव्याच्या खर्चास रु.१.०० लाख,मोठया जिल्हयांकरिता रु.६०,०००/- व लहान जिल्हयाकरिता रु.४०,०००/- अशी आर्थिक तरतुद करण्यात आली आहे. याबाबत शासन निर्णय रोवस्व-२००७/प्र.क्र.४१/रोस्वरो-१,दिनांक ०४/०२/११ निर्गमित करण्यात आलेला आहे.

उदयोजक व उमेदवारांची प्रत्यक्ष भेट घडवुन देणे असे बदलत्या काळानुसार काम,रोजगार मेळाव्यामार्फत सुरु केले आहे. रोजगार मेळावे आयोजित केल्यामुळे उमेदवार व उदयोजक एक छताखाली आल्यामुळे वेळ,पैसा,व प्रवासाचे श्रम वाचतात उदयोजकांना क्षमता,कौशल्य व कामांची निकड असणारे मनुष्यबळ उपलब्ध होते.

**स्वयंरोजगार मेळावे.**

सध्या राज्याच्या २४ कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्रांमध्ये व्यवसाय मार्गदर्शन कक्ष आहेत. तेथे आवश्यक ते साहित्य,पुस्तके,माहिती पत्रके इ.उमेदवारांना

उपलब्ध असतात व त्यांना वेगवेगळया रोजगाराबददल मार्गदर्शन दिले जाते. तसेच स्वयंरोजगारासाठी त्यांना प्रवृत्त केले जाते. विविध वित्तीय संस्था उदा.,बॅका,जिल्हा उघोग केंद्रे इ.संपर्क साधून स्वयंरोजगारासाठी इच्छूक उमेदवारांना मदत केली जाते. स्वयंरोजगाराबददल मार्गदर्शन करण्यासाठी मेळावे आयोजित करुन व्यवसायिक मार्गदर्शन उपलब्ध करण्याची कामे दरवर्षी दिली जातात. उदा.स्वयंसेवी संस्थांचे मार्गदर्शन मिळविणे, आय.टी.आय बरोबर कार्यशाळा ठेवणे, तांत्रिक क्षेत्रात असणा-या तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन मिळविणे,जसे उद्योजक,एल.आय.सी मार्फत मेळावे घेणे.खादी ग्राम उद्योग,जिल्हा उद्योग केंद्र यासारख्या यंत्रणाबरोबर मेळावे किंवा चर्चासत्र ठेवणे इ. कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता विभागाच्या नविन धारेणानुसार आता स्वयंरोजगाराकडे जास्त भर देण्यात येत आहे. त्यामुळे स्वयंरोजगाराबाबत मार्गदर्शन व मेळावे आयोजित करण्याच्या कामाला प्राधान्य देण्यात येत आहे.

**(ह) प्रमोद महाजन कौशल्य विकास व उदयोजकता विकास अभियान**

मा.प्रतंप्रधान यांच्या स्किल इंडीया या संकल्पनेस अनूसरुन महाराष्ट्र शासनाने कुशल महाराष्ट्र रोजगारयुक्त महाराष्ट्र हे ध्येय समोर ठेऊन राज्यात **प्रमोद महाजन कौशल्य विकास व उदयोजकता विकास अभियान** राबविण्याचे ठरविले आहे

केंद्र शासनाच्या धरतीद्वारे राज्यात राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाला चालना देण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक १९ मे २०१० च्या शासननिर्णयानुसार मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय शिखर परिषद व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यकारी समितीची स्थापना करण्यात आली आहे.

सामान्य प्रशासन विभाग यांचा दि.०८/०९/२००० रोजी तसेच कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता विभाग याचा दि.११/०२/२०११ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे आयुक्त रोजगार व स्वयंरोजगार यांचे पदनाम आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता असे सुधारित करण्यात आले असून राष्ट्रीय कौशल्य विकास अभियानाच्या समन्वयाचे कामकाज सदर व आयुक्तांकडे सोपिविण्यात आले आहे.

राज्यात राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती व विभागीय स्तरावर विभागीय कौशल्य विकास कार्यकारी समिती स्थापना करण्यात आलेली आहे.या दोन्ही समितीचे मुख्य उददेश कुशल मनुष्यबळाचे उदिद्ष्ट गाठण्यासाठी आराखडा तयार करणे,कुशल मनुष्य बळास रोजगार उपलब्ध

होण्याच्या दृष्टीने सहाय्यक मार्गदर्शन,नियंत्रण करणे व विभागनिहाय प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीचा आढावा घेणे असे आहे.

भविष्य काळातील कुशल मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन सन २०२२ पर्यत राष्ट्रीय स्तरावर ५० कोटी एवढया कुशल मनुष्यबळाचे उदिदष्ट ठरविण्यात आलेले आहे. त्या आधारे महाराट्र राज्यासाठी ४.५ कोटी एवढे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शासनाने स्थापित केलेल्या अकरा क्षेत्रनिहाय कौशल्य समित्याकडून त्या क्षेत्राचे कुशल मनुष्य बळाच्या राज्यस्तरीय कृती आराखडा तयार करण्यात येत आहे.

राज्यस्तरीय कौशल्य विकास कार्यक्रमाचे नियोजन पर्यवेक्षण व समन्वय करण्याकरिता आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता यांच्या अधिपत्याखाली एक स्वतंत्र कक्षाची निर्मिती करण्यात आली असून या कक्षासाठी व्यवसायिक तज्ञ व्यक्तीची सेवा कंत्राटी पदधतीने उपलब्ध करुन घेण्यात आली आहे.

या अभियांनातर्गत कार्यप्रणव वयोगटातील १५ ते४५ या वर्षापर्यंतच्या वयोगटातील उमेदवारांना अधिक मागणी असलेल्या क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार व्यावसायिक कौशल्य विकास,कौशल्यवर्धन ,पुनकौशल्य विकास द्वारे रोजगारक्षम करुन त्यापैकी किमान ७५% प्रत्यक्ष नोकरी किंवा स्वयंरोजगार मिळवून देण्यात येतो.हे करत असताना समाजातील उपेक्षित घटक जसे की,अनुसुचित जाती,जमाती,महिला,अपंग,अल्पसंख्यांक इ. सहभागावर विशेष भर देण्यात येतो.

**(५) कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता कार्यप्रणालीचे संगणकीकरण**
**संगणकीकरण**

बेरोजगार उमेदवारांना नाव नोंदणी ,नुतनीकरण इ.सेवा जलदगतीने मिळाव्यात म्हणून सन १९८५-८६ मध्ये संगणकीकरण योजना अंमलात आणली. त्यानंतर टप्प्याटप्प्याने कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता यंत्रनेतील सर्व कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्राचे संगणकीकरण पूर्ण करण्यात आले आहे. संगणकीकरणामुळे उमेदवारांचे नाव नोंदणी ,नूतनीकरण,अपडेशन,स्थलांतर व पाठविणे इ.कामे ऑनलाईन पदधतीने जलदगतीने करणे शक्य झाले आहे. उमेदवारांना संगणकीकृत ओळखपत्र आवश्यक त्या माहिती सह देण्यात येते.तसेच संगणक प्रणालीद्वारे नियुक्त्यांना तात्काळ त्यांच्या मागणीप्रमाणे संगणीकृत उमेदवारांची यादी उपलब्ध करुन देण्यात येते.

**वेबसाईट :**

कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता यंत्रणेची ही https://www.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलचे मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते दि.३० मे २०१७ रोजी लोकापर्ण करण्यात आलेले आहे. या वेबसाईटद्वारे उमेदवारांची नोदणी,नूतनीकरण,अपडेशन,ज्येष्ठता पहाणे इत्यादी सुविधा ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच वेबसाईट मध्ये योजना,व्यवसाय,प्रशिक्षण व स्वयंरोजगार इ.माहिती देण्यात आलेली आहे.उमेदवारांच्या नावाची शिफारस त्याच्या पात्रतेप्रमाणे नियोक्त्यांकडे केल्यास त्या उमेदवाराला एसएमएसद्वारे संदेश देण्याची सुविधा १ मे २०११ पासून सुरु करण्यात आली आहे.

नियोक्त्यांकरिता त्यांच्या आस्थांपनाची नोंदणी करणे,योग्य उमेदवारांना शोध घेणे, रिक्तपदे अधिसूचना करणे,विवरणपत्रे सादर करणे इ.सुविधा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. उमेदवारांना नोंदणीपट वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यांत आलेला असून त्याद्वारे नियोक्ते,त्यांना अपेक्षित असलेल्या पात्रतेप्रमाणे उमेदवारांची यादी वेबसाईटवरुन उपलब्ध करुन घेऊ शकतात.

(६) **सेवायोजन कार्यालय (रिक्तपदे सक्तीने अधिसूचित करणे) अधिनियम. १९५९ नियमावली १९६०** :

प्रत्येक जिल्हयामध्ये सार्वजनिक व खाजगी क्षेत्रामध्ये किती उदयोग /व्यवसाय/ कार्यालय आहेत व त्यामध्ये किती लोक काम करीत आहेत व त्याच्याकडे रिक्त पदे निर्माण झाली आहेत. इत्यादी बाबतची अघयावत माहिती संकलित करण्यासाठी कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र आहे .या विभागाने मिळालेल्या माहितीच्या आधारे अधिसूचित झालेली जिल्हयातील रिक्त पदे उमेदवारांना त्यांची पाठवणी करण्याच्या दृष्टीने उपयोगात आणावी अशी अपेक्षा आहे. ही सर्व माहिती निरनिराळया संस्थाकडून / आस्थापनाकडून संकलित करणे सुलभ व्हावे म्हणून केंद्र शासनाने सेवायोजन कार्यालये (रिक्तपदे अधिसूचित करण्याची सक्ती करणारा) कायदा १९५९ केला असून त्याची अंमलबजावणी १ मे १९६० पासून करण्यात आली आहे. या कायदयातील प्रमुख तरतुदीबाबतची माहिती पुढे दिली आहे.

**या कायदयाची कक्षा :-**

सार्वजनिक क्षेत्रातील सर्व आस्थापना. कार्यालये उदयोग व्यवसाय तसेच खाजगी क्षेत्रामधील शेती व्यतिरिक्त ज्या आस्थापनामध्ये सर्वसाधरणपणे २५ किंवा जास्त कर्मचारी काम करतात असे उदयोगधंदे.व्यवसाय .कार्यालये इत्यादीनां या कायदयातील तरतुदी बंधनकारक आहेत. म्हणूनच केंद्र शासन व राज्य शासन यांची सर्व कार्यालये. जिल्हा परिषदा महानगरपालिका नगरपालिका यासारख्या स्थानिक सस्ंथा व केंद्र किंवा राज्य शासन यांचे पुरस्कृत /अंगीकृत उदयोग व्यवसाय आदीनां हया कायदयाच्या तरतुदी लागू आहेत. राष्ट्रीयकृत बँका, महामंडळे, अर्धशासकिय उदयोग,व्यवसाय हे सर्व कायदयाच्या कक्षात येतात. शिवाय खाजगी क्षेत्रामध्ये ज्या कार्यालयात

/उदयोग व्यापार व्यवसायात/कारखान्यात सामान्यपणे २५ किंवा अधिक कामगार काम करीत असतील त्यांनासुध्दा वरील कायदा बंधनकारक आहे. या कामगिरीत मासिक पगार किंवा मोलमजुरीवर काम करणारे कामगार क्रियाशील भागीदार यांचासुध्दा समावेश होतो

**या कायदानुसार उदयोजकांवरील निर्बंध**

या कार्यालयातील तरतुदीनुसार केंद्र शासनाने सेवायोजन कार्यालय (रिक्त पदे अधिसूचित करण्याची सक्ती करणारी ) नियमावली १९६० मंजूर केली असून त्यातील तरतुदीनुसार वरील सर्व प्रकारच्या आस्थापनांनी आपल्या जिल्हयामधील स्थानिक कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्रांकडे ३१ मार्च, ३० जून, ३० सष्टेंबर, व ३१ डिसेंबर या प्रत्येक तिमाही अखेर वेतनपटावर असलेल्या सर्व कर्मचा-याची माहिती विहित प्रपत्रामध्ये पाठविणे बंधनकारक आहे. या प्रपत्रामध्ये त्या त्या आस्थापनांमधील कर्मचा-याची संख्या प्रत्येक तिमाहीमध्ये निर्माण झालेली रिक्त पदे त्यापैकी कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्राकडे किती पदे अधिसूचित केली व एकूण किती पदे कोणत्या माध्यमाद्रारे भरली इत्यादी माहिती अंर्तभूत होते. त्याचप्रमाणे योग्य उमेदवारा अभावी किती पदे रिक्त राहिलेली आहेत. त्या पदांची माहितीसुध्दा त्यामध्ये दयावयाची असते.

या कायदयाच्या कलम क्र.४ नुंसार प्रत्येक आस्थापनामध्ये निर्माण झालेली रिक्त पदे प्रत्यक्षात भरती करण्याकरिता ऑनलाईन पध्दतीने उमेदवारांची यादी मिळविणे आवश्यक आहे.

परंतु ही सवलत खाजगी उदयोग व्यवसायासाठीच लागू ठरते कारण शासनाच्या इतर आदेशानुसार सार्वजनिक क्षेत्रामध्ये निर्माण होणारी (लोकसेवा आयोग अथवा तत्सम आयोगव्दारे भरती करावयाची पदे वगळता) इतर सर्व पदे फक्त कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र तसेच जाहिरातीव्दारे भरली जाणे आवश्यक आहे. त्यामुळे त्या आस्थापनांनी स्थानिक कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्रांना रिक्त पदे अधिसूचित करणे व ती सर्व पदे त्या माध्यमाव्दारेच भरणे आवश्यक आहे. काही प्राथम्य दिलेल्या वर्गातील उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरताना इतर माध्यमांचा वापर करण्याची सवलत शासनाने खास आदेश काढून दिलेली आहे. परंतु या सर्व रिक्त पदांची अधिसूचना कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्रांना देणे मात्र बंधनकारक आहे.

**तरतुदाचा भंग करणा-या विरुध्द कारवाई :-**

या कायदयातील नियमांचे सर्व आस्थापनांनी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. त्यासाठी या कायदयाच्या कक्षेत येणा-या उदयोजकांचे संबधित अभिलेख तपासण्याचे अधिकार त्या त्या जिल्हाच्या कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्रातील अधिका-याना दिलेले आहेत. कायदयाच्या तरतुदीचे पालन न करणा-या उदयोजकांविरुध्द कायदेशीर कारवाई करता येते.

महाराट्र राज्यातील ज्या आस्थापना/कार्यालये या कायदयाच्य कक्षेत येत असतील त्यांनी आपापली तिमाही विवरणपत्रे वेळचेवेळी स्थानिक कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्राकडे सादर करण्याची व निर्माण होणरी सर्व रिक्त पदे योग्यवेळी अधिसूचित करण्याची दक्षता घेऊन शासनास सहकार्य करावे. या संबंधात अधिक माहिती हवी असल्यास. उदयोजकांनी स्थानिक

कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्राशी संपर्क साधल्यास त्यांना जरुर ते मार्गदर्शन मिळू शकेल.

या कायदयानुसार कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्रातील अधिका-याना अशा आस्थापनांना भेट देऊन तपासणी करणे तसेच कायदयातील तरतुदी संबंधाने आवश्यक ती माहिती विचारणे आणि दोषी आस्थापनांविरुध्द न्यायालयात खटला भरण्याचे अधिकार आहेत. अशा प्रकारे कायदयांची अंमलबजावणी या कार्यालामार्फतही करण्यात येते.

## नागरिकांची सनद

(७) कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता ,विभागाकडून पुरविल्या जाणा-या सेवा,पुरविल्या जाणा-या सेवा,त्यासाठी आवश्यक कागरपत्रे,कालावधी व सेवा पुरविणास अधिकारी इत्यादी.

| अ. क्र. | विभागाकडून/ कार्यालया कडून पूरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रे | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्या नंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | सेवा पुरविणारा अधिकारी/ कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्याच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व तक्रार निवारण्यासाठी लागणारा कालावधी | अपिलिय आधिकारी व तक्रार निवारण्या साठी लागणारा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | नाव नोंदणी प्रत्यक्ष | १)शैक्षणिक/ व्यवसाय/तांत्रिक पात्रता प्रमाणपत्र २)जन्मदिनांकाचा पुरावा ३)जातीचा दाखला ४)अनुभवाचा दाखला ५)अधिवास्स प्रमाणपत्राचा अन्य पुरावा | ऑनलाईन पध्दतीने | जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी सोलापूर | उपसंचालक, रोजगार व स्वयं रोजगार,विभागीय मुख्यालय पुणे तक्रार प्राप्त झाल्या पासून १५ दिवस | आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालयनालय , कोकण भवन,नवी मुंबई दु.क्र.०२२-२७५७१९४२/ २७५७१९४४ अपील प्राप्त झाल्यापासून ३० दिवस |
| २ | नोंदणी स्थलांतर करणे | -- | ऑनलाईन पध्दतीने | ऑनलाईन पध्दतीने | -- | -- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | नूतनीकरण (प्रत्यक्ष अगर अन्य व्यक्ती हजर) | नोंदणी कार्ड | ऑनलाईन पध्दतीने | ऑनलाईन पध्दतीने | वरील प्रमाणे | |
| ४ | नूतनीकरण ऑनलाईन वेबपोर्टल | नोंदणी कार्ड | ऑनलाईन पध्दतीने | ऑनलाईन पध्दतीने | वरील प्रमाणे | नोंदणी कार्ड |
| ५ | पात्रता/ अनुभव वाढ | पात्रता /अनुभवांचे दाखले | ऑनलाईन पध्दतीने | ऑनलाईन पध्दतीने | ऑनलाईन पध्दतीने | वरील प्रमाणे |
| ६ | वरील १ ते ५ | विस्तृत माहिती सह तक्रार अर्ज | तक्रार अर्ज प्राप्त झाल्या पासून एका महिन्यात | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे | वरीलप्रमाणे |

## तक्रार निवारणा-यासाठी संपर्क

| अ. क्र | तक्रार निवारण अधिकारी व कार्यालयाचा पत्ता | दूरध्वनी व फॅक्स क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|
| १ | उपसंचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय मुख्यालय, पुणे | ०२०-२६६८३६१३ | dydirdhq.pune@ese.maharashtra.gov.in |
| २ | आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचानालय ,३ रा मजला,कोकण भवन,(विस्तारित),नवी मुंबई-४००६१४ | ०२२-२७५७१९४२<br>०२२-२७५७१९४४<br>फॅक्स-२७५७३०१६ | com.mumbai@ese.maharashtra.gov.in,<br>maharojgar@gmail.com |

## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सोलापूर

### संरचनात्मक तक्ता




*********

**(८) विभागातील अधिका-यांचे दुरध्वनी क्रमांक**

कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता विभाग,
नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,
१४ वा मजला,मंत्रालय
मुंबई ४०००३२

| अ.क्र | विभाग प्रमुखांचे नाव | दूरध्वनी क्रमांक व फॅक्स क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|
| १ | प्रधान सचिव,<br>कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता विभाग खो.क्र.४११,४ था मजला,मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुबंई -४०००३२ | ०२२-२२०२५३०१<br>फॅक्स क्र.०२२-२२८३८८०९ | |
| २ | उपसचिव,<br>कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता विभाग १४ वा मजला,नवीन प्रशासकीय इमारत मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,मत्रालय,मुंबई-४०० ०३२ | दूरध्वनी क्र.०२२-२२७९३९५७ | --- |
| ३ | उपसचिव,<br>कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता विभाग, १४ वा मजला,नवीन प्रशासकीय इमारत मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२ | दूरध्वनी क्र.०२२-२२८३८७८३ | --- |
| ४ | अवर सचिव,<br>कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता विभाग ,१४ वा मजला,नवीन प्रशासकीय इमारत मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय-४०० ०३२ | दूरध्वनी क्र.०२२ २२८३८७८५ | --- |

## १९ कौशल्य विकास व उद्योजकता ,विभागाच्या अधिनस्त कार्यालयांची माहिती

## पुणे विभाग

| अ.क्र. | कार्यालयप्रमुखांचे नाव,पदनाम व कार्यालयाचा पत्ता | दूरध्वनी क्र.फॅक्स क्र. | ई-मेल |
|---|---|---|---|
| १ | आयुक्त,<br>कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता संचालनालय<br>३रा मजला,कोकण भवन,(विस्तारित),<br>नवी मुंबई-४००६१४ | २७५६४८९२<br>२७५७१९४२<br>२७५७१९४४<br>फॅक्स क्र-<br>२७५७३०१६ | com.mumbai@ese.maharashtra.gov.in, maharojgar@gmail.com<br>dydirde.mumbai@ese.maharashtra. gov.in |
| २ | उपसंचालक,<br>कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता,<br>विभागीय मुख्यालय,पुणे. | ०२२-२७५७१०१५<br>फॅक्स<br>२७५७१०१५ | dydirdhq.pune@ese.maharashtra.gov.in |

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित मुंबई.

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम) जी.टी.हॉस्पिटल कंपाऊंड,बद्रुद्दिन तय्यबजी मार्ग, जे.जे.स्कूल ऑफ आर्टसच्या पाठीमागे,मुंबई ४०० ००१.

| अ.क्र | कार्यालय प्रमुखाचे नाव,पदनाम व कार्यालयांचा पत्ता | दुरध्वनी क्रमांक व फॅक्स क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापकीय संचालक,<br>अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित,मुंबई. | दुरध्वनी/फॅक्स क्र<br>०२२-२२६५०७६६२<br>०२२-२२६५८०१७ | apamvmmm@gmail.com |

*********